पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११ ०१८
फोन नं. ०२० - ६७३३१३१०
फॅक्स नं. ०२० - २७४२५६००
वेबसाईड :- www.pcmcindia.gov.in

जा.क्र./वैद्य/९/४०७१/२०२० दि. १३/०७/२०२०

विषय :- पिंपरी चिंचवड हद्दीत कोवीड-१९ चा प्रादुर्भाव कमी करणेकामी प्रतिबंधात्मक उपाययोजना

संदर्भ :- १. भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनयम २००५.
३. महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम २०२०.
४. महसूल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्ननवसन विभाग आदेश क्र.डीएमयु/२०२०/प्र.क्र./९२/डी आयएसएम-१ दि.२९ जुन २०२०.
५. दि.१०/०७/२०२० रोजी विभागीय आयुक्त, कार्यालय पुणे झालेल्या बैठकीतील निर्देश.
६. या कार्यालयाचे आदेश क्र. जा.क्र./वैद्य/९/४०६६/२०२० दि. १२/०७/२०२०

सुधारीत आदेश

ज्याअर्थी, जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळें पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४ च्या तरतुदी दिनांक १३/०३/२०२० च्या अधिसुचनेपासुन लागू करण्यात आलेली असून त्या अंतर्गत नियमावली महाराष्ट्र कोविड उपाय योजना नियम - २०२० तयार करुंन दिनांक १४/०३/२०२० ला प्रसिध्द करण्यात आली या नियमावलीतील नियम १० नुसार कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी, महसुल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र. डीएमयु/2020/प्र.क्र/९२/डी आयएसएम-१, दिनांक २९ जुन २०२० नुसार निर्देश देण्यात आले आहेत की, स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन महानगरपालिका आयुक्तास साथरोगाच्या फैलावास प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक क्षेत्रामध्ये काही उपाययोजनांची अमंलबजावणी करता येईल आणि परवानगी दिलेली बिगर अत्यावश्यक कार्ये व नागरिकांच्या संचार करण्यावर आवश्यक ते निर्बंध घालता येतील.

त्याअर्थी, पुणे जिल्हयातील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीचे कार्यक्षेत्रातील कोरोना विषाणूचा परिरोध (प्रतिबंध) करुन वाढती रुग्णसंख्या आटोक्यात आणण्यासाठी काही उपाययोजना करणे गरजेचे आहे म्हणून विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी वा परिरोध करण्यासाठी तातडीची उपाययोजना म्हणून साथरोग अधिनियम, १८९७ चे कलम २,३ व ४ तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व महाराष्ट्र कोविड उपाययोजना, २०२० याच्या अन्य सर्व सहाय्यकारी तरतुदी अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत मी, श्रावण हर्डीकर, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आपल्या

अधिकारात, या आदेशाद्वारे पिंपरी चिंचवड शहराचे हद्दीत कोविड-१९ विषाणूचा परिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी उपरोक्त संदर्भांकीत क्र ६ अन्वये आदेश निर्गमीत केले आहेत. सदर आदेशामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करुन आदेश जाहीर करणेत येत आहेत. संदर्भ क्र. ६ मधिल उर्वरीत तपशिलामध्ये कोणताही बदल नाही.

२. तथापि, खालील अत्यावश्यक बाबी / सेवा मर्यादीत स्वरुपात व निर्बंधासह सुरु राहतील.

| | |
|---|---|
| f. | पेट्रोलपंप व गॅसपंप सकाळी ९.०० ते सायं. ६.०० या वेळेत सुरु राहतील व ते केवळ शासकीय वाहने व अत्यावश्यक सेवेतील व पुरवठा साखळीतील वाहनास इंधन पुरवठा करतील. |
| p | सर्व औद्योगिक आस्थापना उक्त कालावधीत सुरु राहतील. सदर अस्थापना मधिल कार्यरत अधिकारी / कामगार यांना संबधीत अस्थापनेच्या एच आर विभाग प्रमुख यांनी यासोबतच्या अनुसुची प्रमाणे वाहन परवाना कंपनीच्या लेटरहेड वर निर्गमित करावा. त्या करीता त्यांना प्राधिकृत करणेत येत आहे. कंपनी कडुन निर्गमित करणेत आलेल्या परवान्यांची माहीती संबधीत पोलिस आयुक्त व पोलिस स्टेशन प्रभारी यांना सादर करावी. कंपनी कामगार यांनी कामावर जाताना व परत येताना प्रवासा दरम्याने कंपनिचे ओळखपत्र व कंपनी कडुन पुरविण्यात आलेला वाहन परवाना सोबत ठेवणे बंधनकारक करण्यात येत आहे. तथापी, ज्या औद्योगिक आस्थापनामध्ये कोवीड-१९ चा रूग्ण आढळून आल्यास असा कामगार / अधिकारी कार्यरत असलेल्या युनिट मधिल सर्व कामगारांची कोवीड-१९ ची तपासणी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. दरम्यानच्या कालावधीत संबधित युनिट बंद ठेवण्यात यावे. चाचणी पुर्ण झाल्या नंतर व संबंधित युनिटचे निर्जंतुकीकरण पुर्ण झाल्या नंतरच ते परत कार्यान्वित करावे. प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील व्यक्तीसच फक्त कामावर उपस्थित राहता येईल. |
| r | माहिती तंत्रज्ञान उद्योग १५% कर्मचारी क्षमतेसह सुरु ठेवता येतील. शक्य असल्यास work from home चा पर्याय वापरण्यात यावा. सदर अस्थापना मधिल कार्यरत अधिकारी / कामगार यांना संबधीत अस्थापनेच्या एच आर विभाग प्रमुख यांनी यासोबतच्या अनुसुची प्रमाणे वाहन परवाना कंपनीच्या लेटरहेड वर निर्गमित करावा. त्या करीता त्यांना प्राधिकृत करणेत येत आहे. कंपनी कडुन निर्गमित करणेत आलेल्या परवान्यांची माहीती संबधीत पोलिस आयुक्त व पोलिस स्टेशन प्रभारी यांना सादर करावी. कंपनी कामगार यांनी कामावर जाताना व परत येताना प्रवासा दरम्याने कंपनिचे ओळखपत्र व कंपनी कडुन पुरविण्यात आलेला वाहन परवाना सोबत ठेवणे बंधनकारक करण्यात येत आहे. तथापी, ज्या औद्योगिक आस्थापनामध्ये कोवीड-१९ चा रूग्ण आढळून आल्यास असा कामगार / अधिकारी कार्यरत असलेल्या युनिट मधिल सर्व कामगारांची कोवीड-१९ ची तपासणी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. दरम्यानच्या कालावधीत संबधित युनिट बंद ठेवण्यात यावे. चाचणी पुर्ण झाल्या नंतर व संबंधित युनिटचे निर्जंतुकीकरण पुर्ण झाल्या नंतरच ते परत कार्यान्वित करावे. प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील व्यक्तीसच फक्त कामावर उपस्थित राहता येईल. |
| s | रद्द करण्यात येत आहे. |
| t | शेतमालाशी कृषि निगडीत प्रक्रिया उद्योग नियमानुसार चालु राहतील. सदर अस्थापना मधिल कार्यरत अधिकारी / कामगार यांना संबधीत अस्थापनेच्या एच आर विभाग प्रमुख यांनी यासोबतच्या अनुसुची प्रमाणे वाहन परवाना कंपनीच्या लेटरहेड वर निर्गमित करावा. त्या करीता त्यांना प्राधिकृत करणेत येत आहे. कंपनी कडुन निर्गमित करणेत आलेल्या परवान्यांची माहीती संबधीत पोलिस आयुक्त व पोलिस स्टेशन प्रभारी यांना सादर करावी. कंपनी कामगार यांनी कामावर जाताना व परत येताना प्रवासा दरम्याने कंपनिचे ओळखपत्र व कंपनी कडुन पुरविण्यात आलेला वाहन परवाना सोबत ठेवणे बंधनकारक करण्यात येत आहे. तथापी, ज्या औद्योगिक आस्थापनामध्ये कोवीड-१९ चा रूग्ण आढळून आल्यास असा कामगार / अधिकारी कार्यरत असलेल्या युनिट मधिल सर्व कामगारांची कोवीड-१९ ची तपासणी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. दरम्यानच्या कालावधीत संबधित युनिट बंद ठेवण्यात |



९०

| | |
|---|---|
| | यावे. चाचणी पुर्ण झाल्या नंतर व संबंधित युनिटचे निर्जंतुकीकरण पुर्ण झाल्या नंतरच ते परत कार्यान्वित करावे. प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील व्यक्तीसच फक्त कामावर उपस्थित राहता येईल. |
| u | सर्व वैद्यकीय व्यावसायीक, परिचारीका, पॅरामेडिकल कर्मचारी, सफाई कर्मचारी व अँम्बुलन्स यांना शहराअंतर्गत वाहतूकीसाठी परवानगी राहिल. त्यासाठी वेगळा पास अथवा परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने या पुर्वि वितरीत केलेले सर्व पास रद्द करणेत येत आहेत. पिंपरी चिंचवड शहराअंतर्गत अत्यावश्यक सेवांकरीताचे पास पिंपरी चिंचवड महानगपालिके कडे epass.addl2@pcmcindia.gov.in वर अर्ज करुन प्राप्त करता येईल. तसेच पिंपरी चिंचवड शहराबाहेरील पास करीता मा. पोलिस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांचे कडे अर्ज करुन प्राप्त करावेत.

उपरोक्त, आदेशाचे पालन न करणाऱ्या विरुध्द कोणतीही, व्यक्ती, संस्था, भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अन्वये कायदेशीर कारवाई करण्याशिवाय, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ याची कलमे ५१ ते ६० च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास पात्र असतील.

वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असताना कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक ते कृत्य व सद्हेतूने केलेल्या कोणत्याही कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचे विरुध्द कुठल्याही प्रकारची कायदेशीर कार्यवाही अथवा खटला दाखल करता येणार नाही. ( आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ७३)

उपरोक्त, नमूद ठिकाणे, संबंधित व्यक्ती, आस्थापना, मालक / चालक/आयोजक / व्यवस्थापक/ कार्यालये इत्यादी यांना प्रत्येकास स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ मधील प्राप्त अधिकाराचा वापर करुन सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, सर्व महानगरपालिकेचे कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, सर्व पोलीस ठाणे यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेले कोविड-१९ च्या व्यवस्थापना बाबतचे राष्ट्रीय निर्देशाचे पालन करणे बंधनकारक आहे. (जोडपत्र-एक)

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १३/०७/२०२० रोजी दिलेला आहे.

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :- १३/०७/२०२०

( श्रावण हर्डीकर )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

सहपत्र – वाहन परवाना.

प्रत :- माहितीस्तव सादर

1. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे
3. मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय
4. मा.जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे
5. मा.प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे

6. सर्व पोलीस स्टेशन पिंपरी चिंचवड शहर
7. तहसिलदार हवेली
8. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

प्रत :- कार्यवाहीस्तव

1. सर्व विभाग प्रमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
2. सर्व क्षेत्रिय अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सदरील आदेश मेगाफोनद्वारे सर्व नागरिकांना अवगत करावेत.
3. जनसंपर्क अधिकारी यांनी आदेशास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

## वाहन परवाना

याद्वारे प्रमाणीत करण्यात येते की, खालील कर्मचारी आमचे कंपनीमध्ये कामास असून सदर परवाना कंपनीमध्ये येणे व जाणे करिता देण्यात येत आहे.

१) कर्मचा-याचे नांव -
पत्ता -
मोबाईल क्रमांक -

२) कर्मचा-याचा आय डी क्रमांक –

३) वाहन क्रमांक –

४) कोठून कोठे -

५) कामाची वेळ -

६) सदरचा पास दिनांक १४ जूलै २०२० ते २३ जुलै २०२० पर्यंत वैध राहील.

मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा यांचेकडील आदेश क्रमांक जा.क्र./वैद्य/९/४०७१/२०२० दि. १३/०७/२०२० नुसार आपणास सदरची परवानगी कंपनीमध्ये येणे व जाणे या करिता देण्यात आलेली असून सदर पासचा दुरुपयोग झाल्यास सदरचा पास तात्काळ रद्द करण्यात येईल.

सही /-
एच आर. / मॅनेजर चे नांव
कंपनी
हुद्दा व शिक्का

# सहपत्र २

कंपनी कडुन निर्गमित करणेत आलेल्या परवान्यांची माहीती खालिल इ-मेल आयडीवर पाठविणेत यावी.

1. पोलिस उप आयुक्त परिमंडळ - १ dcpzone1.pcpc-mh@gov.in -
2. पोलिस उप आयुक्त परिमंडळ – २ dcpzone2.pcpc-mh@gov.in